सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

जा. क्र. : विकाअ/लेखा/निर्लेखन/२०२५/ 3159

दिनांक : 25 NOV 2025

## निर्लेखित साहित्याची विक्री सुचना

या कार्यालयातील जुने निर्लेखित ,निरुपयोगी,कालबाह्य साहित्य विकण्यासाठी अनुभवी आणि इच्छुक खरेदीदाराकडुन दरपत्रके मागविण्यात येत आहेत.या संदर्भातील अधिक माहिती या कार्यालयाच्या सुचना फलकावर व केंद्रिय भांडारामार्फत शासकीय कामकाजाच्या दिवशी, कार्यालयिन वेळेत मिळु शकेल.सदरचे साहित्य इच्छुक खरेदीदाराना दि.25.11.2025 ते दि.16.12.2025 या कालावधीत कार्यालयिन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी ४ .०० या वेळेत दाखविण्यात येईल.सदर साहित्याची पाहणी करुन त्याबाबतचे दरपत्रक दि 17.12.2025 रोजी संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत सीलबंद लखोट्यात सादर करावे. प्राप्त निविदा दि.18.12.2025 रोजी सकाळी 12.०० वाजता उघडण्यात येतील.

## निर्लेखित साहित्याच्या विक्री प्रक्रियेतील अटी व शर्ती:-

१)खरेदीदाराने ई-कचरा व्यवस्थापन नियम २०२२ (**E-Waste Management Rules 2022**) अन्वये पुनर्वापर करणारा (**Recycler**) म्हणुन शासनाच्या प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे.

२)एका उघड्या लिफाफ्यात पॅन कार्ड झेरॉक्स, व्यवसाय रजिस्ट्रेशन झेरॉक्स,जीएसटी रजिस्ट्रेशन झेरॉक्स कार्यालयात जमा करावेत, दुस-या लिफाफ्यात प्रपत्र-अ भरुन आणि रु.5000/- चा डिमांड ड्राफ्ट सीलबंद करुन ते या कार्यालयात सादर करावेत.

३)ईच्छुक खरेदीदारानी केवळ या कार्यालयाकडुन दिल्या जाणा-या को-या प्रपत्र-अ मध्ये आपले दर भरुन सादर करावेत.

दरपत्रक सादर करावयाचा कालावधी : दि.25.11.2025 ते दि.17.12.2025 सकाळी 10.30 वा ते दुपारी 5.00 वाजेपर्यंत असेल. (**शासकीय सुट्टीचे दिवस वगळून**)

दरपत्रके दि. **18.12.2025** रोजी दुपारी 12.०० वाजता उघडण्यात येतील.

४)या कार्यालयातील कालबाह्य,निरुपयोगी,निर्लेखित साहित्य “जिथे आहे जसे आहे” स्थितीत विक्री करणे आहे.

५)विक्री करावयाची वस्तु कार्यालयात दि.25.11.2025 पासून 16.12.2025 पर्यंत कार्यालयिन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते दुपारी ४ .०० या वेळेत पहावयास मिळेल. (संपर्क- अंकुश रामभाऊ चारथड मो.नं. 8605168078)

C/vitta lekha/nirlekhan RO

६) दरपत्रक प्रपत्र-अ मध्ये भरुन सीलबंद करुन द्यावयाचे आहे.सोबत अनामत रक्कम म्हणुन रु.5000 /- इतक्या रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट **"Joint Director,Technical Education, Regional Office, Amravati"** या नावे काढुन दरपत्रकासोबत सीलबंद पाकिटात द्यावा.अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफ्ट सीलबंद पाकिटात जमा न केल्यास ते दरपत्रक रद्द समजण्यात येईल.

७)पुर्ण भरलेले सिलबंद दरपत्रक स्विकारण्याची अंतीम मुदत दि. 17.12.2025 रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत राहील, सायंकाळी ५.०० वाजेनंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत, कोणत्याही प्रकारचा टपालाचा विलंब ग्राह्य धरला जाणार नाही.

८)सिलबंद दरपत्रकाच्या पाकिटावर "लिलावप्रक्रियेचे दरपत्रक" असा उल्लेख करावा.

९)दरपत्रकातील दर प्रत्यक्ष साहित्य पाहुनच भरण्यात यावेत.

१०)सोबत दिलेल्या प्रपत्र-अ मध्ये खरेदीदाराने खरेदी किंमत नमुद करणे आवश्यक आहे.

११)दरपत्रक उघडण्याच्यावेळी केवळ दरपत्रक भरलेल्यानाच उपस्थित राहता येईल.त्याकरिता लिलाव धारकाचा केवळ एकच प्रतिनिधी उपस्थित राहील व उपस्थित असलेल्या प्रतिनिधीला त्याचा ओळखीचा पुरावा दाखवावा लागेल.

१२)ज्यांचे दरपत्रक मंजुर झाले असेल,त्यांनी सदर वस्तु स्वत: आहे त्या स्थितीत व असेल त्या ठिकाणावरुन आदेश मिळाल्यापासुन ०३ कार्यालयिन दिवसाचे आत स्वखर्चाने घेउन जावे.साहित्य नेण्यापुर्वी साहित्याची संपुर्ण रक्कम डिमांड ड्राफ्टव्दारे भरणे आवश्यक आहे. साहित्य खरेदीची रक्कम रोखीने/चेकव्दारा स्विकारली जाणार नाही. ज्यांनी पुर्ण रक्कम भरली नसेल व सदर साहित्य विहित मुदतीत घेउन गेले नाही,तर हे कार्यालय जबाबदार रहणार नाही व डिपॉझिट रक्कम शासनजमा केली जाईल.नंतर त्यावर त्यांचा हक्क राहणार नाही.

१३)दरपत्रक मंजुर झाल्यास रक्कम भरुन साहित्य नेताना गेट पास घ्यावा व गेटपासवर सबंधितांची सही घ्यावी.

१४)साहित्य उचलतांना त्यावर कोणत्याही प्रकारचा टॅक्स वगैरे लागत असेल तर तो खरेदीदाराने स्वत: भरावा.

१५)दरपत्रक मंजुर झाल्यानंतर सर्व साहित्य सांभाळण्याची जबाबदारी खरेदीदाराची राहील.

१६)तांत्रिक कारणास्तव लिलावातील वस्तु विकण्याचा अथवा न विकण्याचा अंतीम निर्णय हा या कार्यालयाचा राहील.

१७)कोणतेही कारण न देता दरपत्रक मंजुर अथवा नामंजुर करण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीकार यांनी राखुन ठेवलेला आहे.तसेच अटी व शर्तीचा भंग केल्यास ठेका रद्द करण्याचा अधिकारही राखुन ठेवण्यात आलेला आहे.

१८)लिलावाच्या तारखेत बदल झाल्यास त्याबाबत संकेतस्थळावर सुचना प्रसिध्द करण्यात येईल.

(मनोज म. अंधारे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
अमरावती

C/vitta lekha/nirlekhan RO

# प्रपत्र – अ

# लिलाव दरपत्रक

मी स्वत: लिलाव करण्यात येणा-या सर्व साहित्याची प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे.मला सदर साहित्याची शासकीय किंमत माहिती आहे.या सर्व प्रक्रियेकरिता लागु असलेल्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. करिता खालीलप्रमाणे दरपत्रक भरत आहे.

(सदर दरपत्रकासाठी ज्या खरेदीदाराची निवड होइल,त्यांनी लवकरात लवकर कार्यालयात डिमांड ड्राफ्ट व्दारे रक्कम भरुन साहित्य घेउन जावे)

| तपशिल | शासकीय किंमत | खरेदीदाराची किंमत (शासकीय किंमती पेक्षा जास्त नमुद करावी) |
|---|---|---|
| कार्यालयातील निर्लेखित साहित्य (जुने संगणक, प्रिंटर, फर्निचर, एसी, कुलर इ.) | रु. 80,000 (अक्षरी रू. ऐंशी हजार फक्त ) | |

सही:

नाव :

एजंसीचे नाव :

दिनांक:

टिप- प्रपत्र अ ची माहिती आपले लेटर हेड वर सील बंद लिफाफ्यात सादर करण्यात यावी.